# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २३/०२/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत १ कि.मी. अंतरावरील मौजा कुही येथे दिनांक १८/०२/२०२२ रोजी फिर्यादी नामे– राकेश गोदरूजी चकोले, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र ०२ अंबाडी ता. कुही जि. नागपुर हा त्याचा मित्राची एम. एच–४९/बीएस– १३३७ क्रमांकाची मोटरसायकल घेवुन अंबाडी येथे जाण्यासाठी निघला असता सायंकाळी ०५.०० वा. दरम्यान कुहीला पोहचला. यानंतर मोटरसायकल मध्ये पेट्रोल व हवा भरून गाडी हवाकेंद्र येथे उभी करून दिनांक १८/०२/२०२२ चे २०:०० वा. ते २०.३० वा. सुमारास फिर्यादी हा पायदळ सौरभ बीअर बार कुही येथे गेला. फिर्यादी हा परत बाहेर येवुन पाहिले तर हवाकेंद्र दुकानात ठेवलेली फिर्यादीची मोटरसायकल दिसली नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. ४०,०००/–रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि ठमके मो.नं. 8788553139 हे करीत आहे.

### ट्रॅक्टर चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत १ कि.मी. अंतरावरील सनविजय कंपनी टि पांईट एमआयडीसी बोरी येथे दिनांक ०८/०२/२०२२ चे १२:०० वा. ते १३.०० वा. फिर्यादी नामे– विनोद पुनाराम सनोडीया वय ४८ रा. टेंभरी याने त्याचे एमएच– ४०/एल– ६१५७ क्रमांकाच्या महीन्द्रा कंपनीचे ट्रॅक्टर च्या मुंडयाचे टायर खराब असल्याने सनविजय कंपनी टि पाईंट वर उभा करून ठेवला होता. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचा कि. ४०,०००/–रू. चा ट्रॅक्टर हायड्राने उचलुन आयसर गाडी मध्ये टाकुन चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार इकबाल ९९२३४७०२४० हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर